
महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# अभिव्यक्ती

वर्ष-७ अंक-४ जून -२०१२



## महापारेषण समाचार विशेषांक

# सांघिक कार्यालयात साजरा झालेल्या वर्धापन दिनाची क्षणचित्रे




स्वागत कक्षात काढलेली
सुंदर रंगावली



अध्यक्षीय मनोगत
व्यक्त करताना
श्री.उत्तम झाल्टे,
संचालक (संचलन)



मनोगत व्यक्त करताना
श्री.प्रताप मोहिते,
संचालक (वित्त)

**प्रिय कर्मचारी बंधू-भगिनींनो,**

६ जून रोजी झालेल्या कंपनीच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त मी आपणा सर्वांना पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. दरवर्षी आपण आपल्या कंपनीला प्रगतीपथावर नेऊ अशी मी आशा करतो. नुकत्याच झालेल्या एका पाहणीत एनटीपीसी ही कंपनी काम करण्यासाठी सर्वोत्कृष्ट ठिकाण म्हणून गणली गेली. नजीकच्या भविष्यात या यादीत आपल्या कंपनीचं नाव आलं तर मला नक्की आवडेल.

संस्था या त्यांची उपयुक्तता आणि तिथं होत असलेल्या कामाच्या दर्जामुळं वाढत असतात. व्यावसायिक ध्येय गाठण्यासाठी तसेच संचालनातील गुणवत्ता राखण्यासाठी संस्था त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा संयुक्तपणे उपयोग करत असते. राज्यातील जनतेला वीज पुरवठा करण्याची महत्त्वाची जबाबदारी आपल्यावर आहे. वीजनिर्मितीच्या ठिकाणापासून वीज वितरणाचे ठिकाण जोडणारा 'महत्त्वाचा दुवा' आपण आहोत. जर हा दुवा स्थिर नसेल तर निर्मितीच्या आणि वितरणाच्या क्षमतांचा काय उपयोग?



आपल्या धोरणकर्त्यांनी डिसेंबर २०१२ पर्यंत आपले राज्य भारनियमनमुक्त करण्याचे ध्येय आपल्यापुढे ठेवलेले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी तिन्ही कंपन्यांनी परस्पर सहयोगाने एका दिशेने काम करण्याची गरज आहे. हे ध्येय गाठण्यासाठी आपण आपली संसाधनं आणि क्षमता वापरून पारेषणाची जबाबदारी समर्थपणे आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे. भारनियमनमुक्त राज्याचे उद्दिष्ट गाठताना आपण आपली वार्षिक उद्दिष्टे तसेच उत्कृष्ट आर्थिक कामगिरीकडे दुर्लक्ष करता कामा नये. आपण वार्षिक संचलन आराखड्यात आपली सामूहिक उद्दिष्टे निश्चित केली आहेत. तसं केल्यानं आपल्याला आपल्या प्रगतीचा जवळून आणि नियमितपणे आढावा घेता येईल.

भारनियमनापासून मुक्ती म्हणजे सध्याची वीजेची कमतरता भरून काढण्यासाठी यंत्रणेत आणखी वीज आणणे. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या पारेषण जाळयावर अधिकचा ताण सहन करण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. यासाठी लागणारी उपकेंद्र, वाहिन्या यांची उभारणी करावी लागेल. त्याचवेळी ICT किंवा वाहिनीतील जास्तीचा वीजभार तपासण्यासाठी पावलं उचलावी लागतील. N-1 redundancy criteria, source line constraints आणि augmentation साठी जबाबदार असणारे घटक तपासावे लागतील. जेव्हा यंत्रणेत जास्त वीज येईल तेव्हा काही ठिकाणी आपल्याला पारेषण तसेच वितरण प्रणालीत Low voltage सारख्या समस्यांचा सामना करावा लागेल. अशा वेळी समस्या ओळखून त्यावर मात करण्यासाठी जिथे गरज असेल तिथे capacitor banks ची उभारणी करावी लागेल.

एकत्रितपणे कामाचे नियोजन करताना काही समस्या निदर्शनाला आलेल्या आहेत. महावितरण कंपनीने अशा काही समस्यांची यादी आपल्याला दिली आहे, ज्यापैकी बहुतांश समस्यांचे निराकरण आपण केले आहे. असं जरी असलं तरी उर्वरित काम करण्यासाठी आपल्याला वेळेचे बंधन आहे. काम अपूर्ण राहिल्यानं आपली पीछेहाट होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. त्याचप्रमाणे जेव्हा यंत्रणेवर अतिरिक्त ताण पडतो, तेव्हा नक्की काय होतं याचं आपण बारकाईनं निरीक्षण करायला हवं. यंत्रणा कार्यरत ठेवण्यासाठी भविष्यात निर्माण होऊ शकणारी परिस्थिती हाताळण्याबाबत विचार होणं गरजेचं आहे. त्यासाठी विस्तार करताना आपण योग्य ती काळजी घ्यायला हवी आणि परस्पर सहकार्यही राखायला हवं.

वीजेच्या पारेषणामध्ये ICTs/ Power Transformers, EHV Lines overloading, Low voltage problem यासंबंधी ज्या समस्या उत्पन्न होतात, त्याचा विचार करून त्या काटेकोरपणे दूर करायला हव्यात. आपल्या संस्थेकडे असलेल्या कौशल्याचा वापर करून या समस्या दूर करणं शक्य आहे. त्यासाठी आपल्याला यंत्रणेतील जास्त भारयुक्त घटक ओळखून, ते augment करावे लागतील.

नव्या प्रकल्पांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास आपल्याला EPC / Turnkey यामध्ये संतुलन राखावे लागेल तसेच वार्षिक KPI टार्गेटनुसार नव्या प्रकल्पांचा विचार करावा लागेल. निर्मितीच्या दृष्टीने विचार करता, निर्माण झालेली वीज वाहून नेण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करावे लागेल. अन्यथा सर्व तयारीवर पाणी फेरल्यासारखे होईल. त्याचवेळी भविष्यात वाढणाऱ्या वीजेची मागणी लक्षात घेऊन twin आणि quadruple conductors वापरून अति उच्च दाब वाहिन्या यंत्रणेत आणाव्या लागतील. तसेच 765KV Ultra Voltage वाहिनीची उभारणी टप्प्याटप्प्याने करावी लागेल. आपण गेल्या दोन वर्षांमध्ये ४० अति उच्च दाब उपकेंद्र आणि 2500 सर्किट किमी अतिउच्च दाब वाहिन्यांची उभारणी केली आहे. प्रकल्प राबवण्याची हीच गती आपण कायम ठेवायला हवी.

प्रकल्प राबवत असताना जमीन अधिग्रहणादरम्यान येणाऱ्या अडचणी, रस्त्याचे प्रश्न, पर्यावरण विभागाची परवानगी यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागेल. आपल्याला आपला अनुभव आणि कौशल्य वापरून त्यांचा सामना करावा लागेल. आपण मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये जागेची अडचण लक्षात घेऊन Air Insulated Substation (AIS) ऐवजी नव्या तंत्रज्ञानावर आधारित Gas Insulated Substation (GIS) उभारू शकतो. मुंबई आणि पुण्यात Gas Insulated Substation (GIS) उभारण्याचा अनुभव आपल्या पाठिशी आहे. वेळेत प्रकल्प पूर्ण करणे हे यंत्रणा भक्कम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. यंत्रणेची वीज वहनाची क्षमता वाढली तर राज्य भारनियमनमुक्त करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

महाराष्ट्र राज्य भारनियमनमुक्त करण्याच्या दृष्टीने आपण सर्वजण सर्वतोपरी प्रयत्न कराल अशी मला खात्री वाटते.

**अरविंद सिंह**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**Dear Colleague,**

I once again congratulate all on 7th Foundation Day of our Company i.e. 06-06-2012. I wish we take our organization to the next level of excellence every year. In a recent study, I saw NTPC among the top ten organizations selected among the "Best Places to Work". I would also like to see our organization's name in such a selection in near future.

Organizations grow with the worth and quality of work they carry out. They often utilize their available resources judiciously to outperform in respect of their business goals, operating standards and system parameters. We have a distinct place in the supply chain of providing electricity to the people of the State. It is "the Vital Link" between the point of generation to point of distribution. In case the link is not stable, the up and down stream capabilities remain unproductive.

Our policy makers have given us the goal of making the State free of load shedding by December '2012. This is a collective target where all the three Companies have to work in a co-ordinated way in one direction. In order to achieve this target we have to align our resources and capabilities such that we shoulder our responsibilities in respect of transmission related activities. While working on this collective target of free load shedding, we should not shift focus from our annual operating targets and of getting good financial results. In order to perform, we have already built up collective targets into our annual operating plan. It will help us to monitor and review our progress closely and regularly.

Load shedding free supply of electricity means bridging the existing deficit and pumping more power into the system. Therefore we must have adequate transformation capabilities to handle additional burden on the network. In this regard we must ensure establishment of the required substations, lines etc. At the same time, we must take steps to check ICT or lines overloading, N-1 redundancy criteria, source line constraints and identify elements for augmentation. When such additional power is pumped into the system, we may encounter the problem of low voltage in certain areas in the transmission as well as the distribution system. In that case we will have to identify and remove the problem and provision for capacitor banks will have to be made wherever required.

As such, these problems have been identified while planning this work in collective way. The Discom has given us the list of problem areas out of which we have addressed most of them. However we have to work in time bound manner for the actions which are remaining to ensure that there is no set back due to incompletion of activities at our end. Similarly we also need to closely monitor how the system reacts when such additional load is actually put on it. There may be some contingencies which will have to be handled to maintain system availability. Hence we must take due precautions and carry out augmentation measures with effective co-ordination.

The transmission constraints in respect of ICTs/ Power Transformers, EHV Lines overloading, Low voltage problem etc. we must be foreseen and eliminate meticulously. All these issues can be resolved given the existing skills and experience to tackle such issues in our organisation. We need to identify overloaded elements in the system and need to augment them.

In respect of new project work, we have to execute balance EPC/ Turnkey and new projects as per our annual KPI targets. At the Generation point, we must ensure arrangement for power evacuation, failing which all other preparedness shall be futile. At the same time, we must plan for future load growth, where EHV Lines with quadruple and twin conductors can be put in the system. Similarly, construction of 765 KV Ultra Voltage Lines have to be carried out in phased manner. We have commissioned 40 EHV sub-stations and more than 2500 Circuit KM of EHV lines in the last two years. This momentous of execution must be carried forward.

While executing projects, challenges in respect of acquisition of land, Right of Way issues and environmental clearances are likely to be faced. However we need to tackle them proactively and that is where our experience and expertise is required to be put to use. We could explore a shift from Air Insulated Substation (AIS) to Gas Insulated Substation (GIS) in space constrained cities such as Mumbai, Pune and Nagpur. We have experience of establishing GIS sub-station at Mumbai and Pune. Timely project execution is the base of system support for additional power transmission for making the State free from load shedding both by building the required associated transmission system for evacuation as well as for strengthening the existing network.

I am confident that you will put your best in achieving the target of freeing Maharashtra State from load shedding. With best wishes,

**Arvind Singh**
Chairman and Managing Director

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | पान क्र. |
|---|---|---|
| १. | घडामोडी | १ ते ३ |
| २. | प्रशिक्षण वार्ता | ४, ५ |
| ३. | वर्धापनदिन वृत्तांत | ५ ते ८ |
| ४. | लेख | ९ ते १३ |
| | हसरे पत्र | ९ |
| | भ्रमणध्वनी : शाप की वरदान? | ९ |
| | नियंता | १० |
| | मन उधाण वाऱ्याचे... | ११ |
| | खेळतेपणातलं जाणतेपण | १२ |
| | अक्षरधाम मंदिरः एक चमत्कृती | १३ |
| ५. | कविता | १४ ते १५ |
| | नवं आकाश अंगावर पेलू दे | १४ |
| | आहुती | १४ |
| | धूळ | १५ |
| | सुख | १५ |
| ६. | गौरव | ८, १०, ११, १२, १६ |
| ७. | From The Desk of ED (HR) | १७ |

## वरसगाव येथे रोहित्राचे जागेचे भूमिपूजन




**पुणे :** अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे अंतर्गत १३२/२२ के.व्ही. वरसगाव उपकेंद्राची १×२५ एम.व्ही.ए. १३२/२२ के.व्ही. क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसवून उपकेंद्राची विद्युत क्षमता वाढविण्यासाठी रोहित्राच्या जागेचे भूमिपूजन मा. खासदार सौ.सुप्रिया सुळे यांच्या हस्ते वरसगाव, ता. वेल्हे, जि. पुणे येथे नुकतेच संपन्न झाले.

राज्य भारनियमनमुक्तीकडे वाटचाल करीत असतानाच वीजक्षेत्रात पायाभूत सुधारणांचा वेग वाढल्यामुळे वीजवहन यंत्रणा सक्षम झाल्याने शहरासोबतच ग्रामीण भागातही विकासाच्या प्रगतीच्या संधी उपलब्ध असल्याचे मत मा.खासदार सौ.सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले.

उपकेंद्राच्या क्षमतावाढीसाठी ८ कोटी ७४ लाख खर्च प्रस्तावित असून पानशेत, खानापूर, वेल्हा, वरसगांव भागातील शेती उद्योगाला सुरळीत व योग्य दाबाने वीजपुरवठा होईल अशी माहिती मुख्य अभियंता श्री.पी.आर.देवरे यांनी प्रास्ताविकातून दिली.

या कार्यक्रमाला महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री.सिद्धार्थ नागटिळक, पुणे जिल्हा विद्युत समन्वय समिती सदस्य श्री.प्रविण शिंदे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, श्री.दत्तात्रय भरणे, मुळशीच्या सभापती सौ.उज्वला पिंगळे, उपसभापती श्री. माधव कोंढरे यांच्यासह महापारेषण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री.एम.आर. भगत, श्री.आर.एल.गायकवाड, श्री.अनिल कोलप, श्रीमती विजया मुखेडकर, कार्यकारी अभियंता श्री.ए.सी. मणूरकर, श्री.सतिश गायकवाड, श्री.बी.एम. सिंगी, श्री.पी.एस. कुरसंगे, सौ. ज्योती चिमटे, श्री.आर.ई.पोटे तसेच महापारेषण व महावितरण कंपनीचे अभियंते/कर्मचारी उपस्थित होते.

## हॉट लाईन युनिट चंद्रपूर कार्यालय कार्यान्वित

**चंद्रपूर :** अति उच्च दाब संवसु मंडळ चंद्रपूर अंतर्गत येणाऱ्या चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यातील सबस्टेशन व लाईनवरील वीजपुरवठा खंडित न करता मेंटेनन्स ची कामे करण्यासाठी चंद्रपूर येथे हॉट लाईन युनिट नुकतेच कार्यान्वित करण्यात आले.

या प्रसंगी महापारेषण प्रविभागाचे अधीक्षक अभियंता श्री.नरेश तेलतुंबडे, श्री.वीके तसेच कार्यकारी अभियंता श्री.आत्राम, श्री.देशपांडे, श्री.निबाळकर, श्री.अणे, श्री.सारडे व उपकार्यकारी अभियंता श्री.भोयर, श्री.घाटे, श्री.वानखेडे, सौ. कामडे, कु.वाघमारे आणि महावितरण प्रविभागाचे अधीक्षक अभियंता श्री.भोरटके हे उपस्थित होते.

सांघिक कार्यालयाने पुरवठा केलेल्या २२० केव्ही हॉट लाईन टूल्सच्या सात संचांपैकी एक संच हॉट लाईन युनिट चंद्रपूरला मिळाला.

हॉट लाईन युनिट चंद्रपूर च्या कार्यान्वयनाला मा.मुख्य अभियंता श्री.लक्ष्मीदास सोनकवडे, नागपूर परिमंडळ येथे रूजू झाल्यानंतर विशेष वेग आला व त्याचे फलित म्हणेज हॉट लाईन युनिट चंद्रपूर कार्यालयाचे उद्घाटन शास्त्रीनगर चंद्रपूर येथे झाले. हॉट लाईन युनिट चंद्रपूर यांचे सुसज्ज कार्यालय तयार करून देणाऱ्या स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.वाघ व उपकार्यकारी अभियंता श्री.देशपांडे व कनिष्ठ अभियंता श्री.भोळे यांचे अधीक्षक अभियंता यांनी कौतुक केले.

हॉट लाईन युनिट सुरू झाल्यानंतर लगेच हॉट लाईनचे काम हाती घेण्यात आले. २२० केव्ही वरोरा - हिंगणघाट या महत्त्वाच्या लाईनचे मनोरा क्र. २७९ वरील R-ph (Top ph) ची faulty insulator suspension string "Hot Stick Method" चा वापर करून लाईनवर आउटेज न घेता अ.उ.दा. संवसु. प्रविभाग चंद्रपूर अंतर्गत हॉट लाईन युनिट ने लाईन मेंटेनन्स उपविभाग हिंगणघाट यांच्या मदतीने यशस्वीपणे बदलली. हे काम आउटेज न घेता केल्यामुळे या लाईनवरील M/s. WPCL वरोरा कंपनीचे Generation 170MW अबाधित राहिले.

सदर काम मा. श्री.सोनकवडे, मुख्य अभियंता नागपूर पारेषण परिमंडल, मा.श्री. तेलतुंबडे, अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पारेषण प्रविभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.भोयर, उपकार्यकारी अभियंता हॉट लाईन युनिट चंद्रपूर व संबंधित कर्मचाऱ्यांनी केले.

# ४०० के.व्ही. जी.सी.आर. कोराडी येथील मुख्य बसवर अत्यावश्यक काम : नागपूर परिमंडलाची अभिमानास्पद कामगिरी

४०० केव्ही कोराडी उपकेंद्र हे कोराडी येथील तसेच आवश्यकतेनुसार चंद्रपूर व सारणी येथूनही घेतलेल्या वीजेचे वहन करण्याचे काम करते व ग्रीड मधील अतिशय संवेदनशील व महत्त्वाचे उपकेंद्र आहे.

कोराडी उपकेंद्रात ४०० केव्ही भुसावळ फिडर वरती बंडल कंडक्टर (Y phase) ला असलेल्या स्टार क्लॅम्प वरती Hot Glow निदर्शनास आला. तसेच बाजूचा कंडक्टरचा १.५' व ०.५' कंडक्टर डॅमेज झालेला आढळला तसेच ४०० केव्ही अकोला फीडरचे बी फेज पेंटाग्राफ Isolator मध्ये बंद होताना गॅप आढळली व सदर Isolator वापरणे बंद झाल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या, तसेच ४०० केव्ही चंद्रपूर फीडर वर सुद्धा १.५'' व ६'' चे दोन असे तीन ठिकाणी कंडक्टर डॅमेज झालेले आढळून आले होते.

वरील सर्व कामे सध्याचे सिस्टीम कंडीशन पाहता तसेच ४०० केव्ही जीसीआर मधून मेन बस २ वरून वहन होणाऱ्या १००० मेगावॅट पर्यन्त उर्जेच्या वहनामध्ये अडचण निर्माण होऊन संपूर्ण सिस्टीम मध्ये लोड वळवतांना येणाऱ्या अडचणी मुळे सिस्टीम संकटात येण्याची शक्यता निर्माण झाली होती. तेव्हा मुख्य अभियंता नागपूर श्री.सोनकवडे, अधीक्षक अभियंता श्री.देव व सचेत वाहिनी



नागपूर चे उपकार्यकारी अभियंता श्री.देशमुख यांनी सर्व विचार करून सदर काम हॉट लाईनवर म्हणजे सचेत वाहिनीवरच करावयाचे निश्चित केले. नागपूर परिमंडलात सचेत वाहिनीवर बेअर हॅन्ड पद्धतीने ४०० केव्ही वर काम करण्याकरिता लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होते परंतु त्यासाठी आवश्यक असणारे सामान जसे Scafold, bare hand suit इत्यादी उपलब्ध नव्हते. तेव्हा मुख्य अभियंता श्री.सोनकवडे व अधीक्षक अभियंता श्री.देव यांनी तातडीने श्री.बढे, मुख्य अभियंता वाशी यांचेशी संपर्क साधून त्यांना आवश्यक सामानासह त्यांच्या कळवा सचेत वाहिनी विभागाचे सहकार्य मागितले.

वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.बढे यांनी कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन जातीने लक्ष घालून व अधीक्षक अभियंता श्री.गहीलवार तसेच उपकार्यकारी अभियंता कळवा श्री.कवाणे यांना नागपूर सचेत वाहिनी विभागासोबत सदर काम करण्याचे निर्देश दिले.

वाशीच्या सचेत वाहिनी विभागाने तातडीने शनिवार, रविवार प्रवास करून आवश्यक सामान व मनुष्यबळ कोराडीला पाठविले.



सदर काम सचेत वाहिनी उपविभाग नागपूर यांनी स.वा. विभाग कळवा यांचेसोबत अतिशय व्यवस्थितपणे संपूर्ण काळजी घेत पूर्ण केले व ४०० केव्ही बसला झालेल्या धोक्याचे निराकरण करून कंपनीचा तसेच महानिर्मिती कंपनीचा मोठा महसूल वाचवून व वेळेवर सिस्टीममध्ये होऊ शकणारा संभावित धोका टाळून अतिशय अभिमानास्पद कामगिरी केली.

सदर काम करतांना श्री.सिंग, कार्यकारी अभियंता कोराडी व श्री.रूपराय, उपकार्यकारी अभियंता कोराडी यांनी अथक परिश्रम घेऊन तसेच सचेत विभागाला आवश्यक असणारे सहकार्य दिले. तसेच सचेत वाहिनीच्या लोकांना काम करतांना त्रास होऊ नये म्हणून सर्वतोपरी सहकार्य केले.

कोराडी येथील नियंत्रण कक्षाच्या कर्मचारी व अधिकारी या सर्वांनी अतिशय उत्स्फूर्तपणे काम करून चार दिवसांचे काम दोन दिवसांत पूर्ण करण्यास मोलाची मदत केली.



## व्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते सुधारित सेवा विनियम पुस्तकाचे प्रकाशन



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने नव्याने संकलित केलेल्या कर्मचारी सेवा विनियमाच्या पुस्तकाच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह यांच्या हस्ते दि. ३० जून रोजी झाले. कंपनीच्या सांघिक कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास श्री.उत्तम झाल्टे, संचालक (संचलन), श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), श्री.प्रताप मोहिते, संचालक (वित्त) यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह म्हणाले, सुधारित कर्मचारी सेवा विनियमाचे पुस्तक कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल. कंपनीसाठी तो एक महत्वाचा ठेवा आहे. तसेच हे पुस्तक कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्याची सूचनाही त्यांनी केली. या पुस्तकासाठी तयार करण्यात आलेल्या Compilation Team च्यावतीने श्री.एस.जी. वानखेडे, उप महाव्यवस्थापक (मासं) यांनी सर्व अधिकाऱ्यांना या उपक्रमाविषयी विस्तृत माहिती दिली.

मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री.सुभाष सोने यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या Compilation Team मध्ये श्री.एस.जी. वानखेडे, उप महाव्यवस्थापक (मासं), श्री.एस.सी. जिल्हेकर, वरिष्ठ व्यवस्थापक - मासं, श्री.के.बी. मानकर, व्यवस्थापक - औरंगाबाद परिमंडल व श्री.स्वप्नील साळुंखे, व्यवस्थापक - मासं यांचा समावेश होता. या सर्वांच्या परिश्रमातून सेवाविनियमाचे सुधारित पुस्तक साकारले आहे.

श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मास.) यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले.

### सुधारित सेवा विनियमाचे पुस्तक प्रसिद्ध करण्यामागची भूमिका

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अस्तित्वात असताना मंडळाने वेळोवेळी कर्मचारी सेवा विनियमाच्या अनुषंगाने विविध खात्यांना उपयोगी पडतील अशी महत्त्वाची परिपत्रके, सुधारपत्रके, सर्वसाधारण आदेश काढले होते. त्यामुळे सेवाविनियमांच्या तरतुदीमध्ये फेरबदल होत गेला. त्याचा विचार करून ठराविक कालावधीने सेवाविनियमाचे सुधारित पुस्तक तयार करून प्रकाशित केले गेले. अशी सेवाविनियमाची इंग्रजीमधील सुधारित आवृत्ती १९९९ मध्ये तर मराठीतील आवृत्ती २००२ मध्ये काढण्यात आली होती.

त्यानंतर, तसेच २००५च्या कंपनीकरणानंतर सुद्धा सदर सेवा विनियमांमध्ये बऱ्याच सुधारणा झाल्यात. महापारेषण कंपनीत नवीन मंडले, विभाग, उप-विभाग तयार झालेले आहेत. त्यांच्यापैकी अनेक नवीन कार्यालयांकडे अद्ययावत सुधारपत्रकांचा संच उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांच्या उपयोगासाठी व माहितीसाठी पुन्हा स्वतंत्र असे पुस्तक प्रकाशित करणे गरजेचे होते. अपल्या परिमंडलातील, मंडलातील तसेच विभागीय/उप विभागीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना तसेच विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील हे अद्ययावत पुस्तक उपयुक्त ठरेल.

## मानव संसाधन विभागाच्या मुख्य महाव्यवस्थापकपदी श्री.माधव पेन्दोर



महापारेषण कंपनीच्या मानव संसाधन विभागात मुख्य महाव्यवस्थापक या पदावर श्री.माधव पेन्दोर रुजू झाले. श्री.सुभाष सोने सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री.पेन्दोर यांना या पदावर बढती मिळाली आहे. कंपनीच्या सांघिक कार्यालयात श्री.पेन्दोर यांनी ३० जून रोजी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला.

श्री.पेन्दोर हे १४ ऑगस्ट १९८४ रोजी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात प्रशासन अधिकारी म्हणून रूजू झाले. त्यानंतर आजपर्यंतच्या सेवेत त्यांनी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मुख्य कार्यालयात मागासवर्ग कक्षप्रमुख म्हणून काम पाहिले आहे. तसेच नागपूर शहर व नागपूर परिमंडल, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र व कंपनीकरणानंतर महापारेषण कंपनीच्या मुख्य कार्यालयात सन २००५ पासून उपमहाव्यवस्थापक (मासं) व महाव्यवस्थापक (मासं) म्हणून कार्यभार सांभाळला आहे. श्री. पेन्दोर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.अरविंद सिंह यांची औरंगाबाद येथील सुभेदारी विश्रामगृह येथे भेट घेऊन चर्चा करण्यात आली, त्या प्रसंगी छायाचित्रात, संचालक प्रकल्प श्री.ओमप्रकाश एम्पाल, मुख्य अभि. श्री.रोहीदास मस्के, सरचिटणीस श्री.सय्यद जहिरोद्दीन, श्री.आर.पी. थारोत, श्री.प्रभाकर लोखंडे, श्री.एम.बी. घोरपडे आदी दिसत आहेत.

## तमसो मा ज्योतिर्गमय



कर्जत येथे 'Train The Trainers'
या प्रशिक्षण शिबिरासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थी

आपल्या कंपनीने आपल्या सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी व पर्यायाने कंपनीच्या उज्ज्वल भविष्यासाठी परिमंडलीय प्रशिक्षणाचा उपक्रम अवलंबला. सर्व परिमंडलीय प्रशिक्षणासाठी, आपल्या कंपनीच्या १५ हजार कर्मचाऱ्यांमधून ५० प्रशिक्षकांची निवड करून त्यांच्या खांदयावर प्रशिक्षणाची जबाबदारी दिली. हे सर्व प्रशिक्षक कंपनीची रोजची कामे पार पाडून ज्ञानप्रबोधनाचे अतिरिक्त काम अविरतपणे पार पाडत असतात.

आम्हा सर्वांच्या मनात एकच प्रश्न होता की यातील बहुतेक प्रशिक्षकांची वयाची २० वर्षे प्रशिक्षण देण्यात गेली आहेत त्यांना काय प्रशिक्षण देणार ? पण निसर्गरम्य कर्जतमधील डॉ. मोदी रिसॉर्टमध्ये चार दिवस चाललेल्या प्रशिक्षणाचा फायदा वर्णन न करता येण्यासारखा आहे. ज्याप्रमाणे हातात फुले घेतली की, हात आपोआप सुगंधी होतात त्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाही त्याप्रमाणे आमच्या सारख्या नवीन प्रशिक्षकांना अनुभवी प्रशिक्षकांकडून महत्त्वाचे ज्ञान प्राप्त झाले व नवीन ऋणानुबंधही जोडले गेले.

या प्रशिक्षणासाठी कंपनीने नियुक्त केलेली एच.आर. ॲनेक्सी या कंपनीचे प्रशिक्षक हे अत्यंत उच्च विद्याविभूषित व भरपूर अनुभवी होते. त्यांनी आमच्या जवळ असलेल्या चांगल्या गुणांची व कमतरतेची जाणीव करून देत आम्हाला प्रशिक्षण दिले. तसेच वेळोवेळी आमच्यातील चांगल्या गोष्टींना त्यांच्याकडून योग्य दाद मिळाली.

प्रत्येक प्रशिक्षक आपल्या परिमंडलात परतताना त्याला आपल्याबद्दल कंपनीला असलेली आपली जाणीव पाहून कृतार्थ झाला आहे व पुढील प्रशिक्षणाची जबाबदारी पेलण्यास सक्षम झाला आहे.

विनय प्रदीपकुमार दोशी
उपकार्यकारी अभियंता (का.)
अ.उ.दा. बांधकाम विभाग-३, सोलापूर

## प्रशिक्षण - एक हवीहवीशी अनुभूती

२६ जूनला सायंकाळी डोंबिवली विभागीय कार्यालयातून फोन आला. दुसऱ्या दिवसापासून चार दिवसांसाठी कर्जत येथे प्रशिक्षणासाठी जायचे असल्याचे कळले. पहिल्यांदा मी हे प्रशिक्षण नाकारायचेच ठरविले होते कारण एकतर दुसऱ्याच दिवशी जायचे होते अन् दुसरे म्हणजे Training चा विषय नीट कळला नव्हता.

पण प्रशिक्षणाचे ठिकाण कर्जत हे कल्याणापासून जवळ असल्याने जायचे ठरवले. नेहमी प्रशिक्षण हे नाशिक, वाशी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्रातच असायचे. यावेळेस एखादया रिसॉर्टमध्ये प्रशिक्षण ठेवून महापारेषणच्या व्यवस्थापनाने सुखद धक्काच दिला. प्रशिक्षणासाठी विशेष परितोषिक मिळविणाऱ्या महापारेषण कंपनीचे हे पुढचे पाऊल योग्यच होते.

आमच्या झोनमधील पडघा विभागीय प्रशिक्षण केंद्रात मी प्रशिक्षक म्हणून जात असतो. महापारेषण कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात अनेकजण शिकवण्यासाठी जात असतात. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा तिथे अनेक प्रशिक्षणार्थींना फायदा होतो. कधी अर्धा दिवस, कधी एक दिवस तर कधी दोन दिवस असं प्रशिक्षण चालू असतं. पण हे प्रशिक्षण One Sided असायचे. प्रशिक्षणार्थींना विषय कळला आहे किंवा नाही हे कोणी बघत नव्हते. कधी कधी प्रशिक्षणार्थी घाबरून असत कारण प्रशिक्षक त्यांचे वरिष्ठ अधिकारी असत. परंतु कर्जत येथील प्रशिक्षणाचा विषयच अफलातून होता... 'Train The Trainers'... प्रशिक्षकांना अधिक चांगले प्रशिक्षक बनविणे.

शिक्षक आणि प्रशिक्षक यातील नेमका फरक श्री.सुगत गमरे यांनी सांगितला. श्री.उत्तमराव झाल्टे सरांनी प्रशिक्षणाचा दर्जा कसा उच्च होत राहील यावर नेमके भाष्य केले. यामुळेच महापारेषणसारख्या सरकारी कंपनीला प्रशिक्षणांसाठी पारितोषिक मिळत आहेत.

सुरुवातीपासून शेवटपर्यंत सकारात्मक वातावरण टिकून राहिले. HR Anexi च्या जाणकार मंडळींनी आमच्या छोटया छोटया चुका ध्यानात आणून दिल्या. आमचे खिशातील हात वा बांधलेले हात अधिक प्रभावीपणे वापरायला लावून आमचा आत्मविश्वास वाढविला. संपूर्ण स्टेजचा वापर करणे, प्रशिक्षणार्थींना विषयात सामील करून घेणे अशा कितीतरी गोष्टी आम्ही शिकलो.

श्री.केळकर साहेबांनी प्रशिक्षणाच्या सांगता समारंभाच्या वेळी Impossible काहीच नसते सर्व काही Possible असते या विषयावर अतिशय प्रभावी Video आणि Slide दाखविल्या.

कर्जतच्या डॉ. मोदी रिसॉर्टच्या निसर्गरम्य परिसरातून हे प्रशिक्षण संपवून आल्यावर मी विचार केला, मला या प्रशिक्षणातून नेमके काय मिळाले ? मी म्हणेन, असे प्रशिक्षण सर्वांना मिळावे, मग तो कोणत्याही कंपनीत असो, कोणत्याही पदावर असो. असे प्रशिक्षण आम्हा पहिल्या बॅचच्या प्रशिक्षणार्थींना मिळाले हे आम्ही आमचे भाग्य समजतो.

कलाकार, वक्ते, गायक जन्मत:च कला अंगी घेवून येत असतात. पण अशा प्रशिक्षणामुळे त्यांच्यातही कला सादरीकरणासाठी प्रभावी सभाधीटपणा, आत्मविश्वास वाढतो हे नक्की.

श्रीकांत पेटकर
उपकार्यकारी अभियंता
वाशाळा उपकेंद्र, डोंबिवली, वाशी झोन

## महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन विविध कार्यालयांत उत्साहात साजरा

**मुंबई :** महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापनदिन कंपनीच्या प्रकाशगंगा या सांघिक कार्यालयात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन) होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.प्रताप मोहिते, संचालक (वित्त) यांची उपस्थिती होती. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

वर्धापन दिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरती पगारे, उपव्यवस्थापक (वि.व ले.), तेजस टिकले, कनिष्ठ अभियंता (संवसु) स्मिता वंजारी, उपव्यवस्थापक (मासं) सुयोग मराठे, सहाय्यक अभियंता (ईआरपी बेसिस) यांनी प्रतिनिधिक स्वरूपात आपले विचार मांडले व कंपनीबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.



अध्यक्षीय भाषणात बोलताना श्री.उत्तमराव झाल्टे यांनी सुरुवातीलाच चारही तरूण वक्त्यांचे कौतुक केले व काम करणाऱ्या तरूणांची अशी टीम असेल तर महापारेषण कंपनीचे भवितव्य उज्ज्वल आहे अशी भावना व्यक्त केली. श्री.झाल्टे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करताना आलेल्या



अडचणींवर कशी मात केली याबद्दलचे अनुभव सांगताना महापारेषण कंपनीच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात वीज पारेषणाच्या क्षेत्रात कशी प्रगती झाली याचा आढावा घेतला. बदल हा निसर्गाचा नियम आहे, आपण बदलाला सामोरे गेलो नाही तर काळ आपल्यात बदल घडवून आणत असतो असे सांगताना कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या प्रगतीसाठी झटले पाहिजे असे मत श्री.झाल्टे यांनी व्यक्त केले. विभाजनानंतर कंपनीची प्रगती झाली असली, तरी ''स्वस्तात वीज'' हे ध्येय डोळयासमोर ठेवून कर्मचाऱ्यांनी अधिक चांगल्या प्रकारे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमात बोलताना श्री.प्रताप मोहिते संचालक (वित्त) म्हणाले, सध्या खाजगीकरणाचे वारे आहे. अनेक क्षेत्रात खाजगीकरण सुरु आहे. वीज वहनाचे क्षेत्र खाजगी कंपन्यांनाही खुले झाल्यामुळे अनेक खाजगी पारेषण कंपन्या वीज वहनाच्या क्षेत्रात उतरत आहेत. त्यामुळे आपली स्पर्धा खाजगी क्षेत्राशी आहे. सध्याच्या काळात महापारेषण कंपनी नफ्यात आहे. ही स्थिती टिकवून ठेवण्याची व कंपनीचा नफा वाढवण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी अधिक कष्ट करण्याची गरज आहे असे मत श्री.मोहिते यांनी व्यक्त केले.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.अनंत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी सांघिक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कंपनीच्या ७व्या वर्धापन दिनानिमित्त सांघिक कार्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी बोरिवलीच्या ॲपेक्स हॉस्पिटलचे सहकार्य लाभले.

---

## प्रशिक्षण वार्ता

### स्थापत्य अभियंत्यांसाठीचे प्रशिक्षण 'यशदा' मध्ये संपन्न

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या स्थापत्य विभागातील अभियंत्यांसाठीचे प्रशिक्षण शिबीर जून महिन्यात पुण्यातील 'यशदा' मध्ये संपन्न झाले. या शिबिरात कंपनीच्या सातही परिमंडळातील ३१ अभियंत्यांनी सहभाग नोंदवला.

१८ जून रोजी श्री.उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन) यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं) उपस्थित होते.

सहा दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात वेगवेगळया विषयातील तज्ञांनी उपस्थित अभियंत्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये जमीन अधिग्रहण ऑर्बिट्रेशन ॲक्ट, माहितीचा अधिकार, कॉन्ट्रॅक्ट लॉ, कामगार कायदा, नेतृत्वगुण विकास, वेळेचे नियोजन, सकारात्मक विचार या व अशा अनेक विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाचा दैनंदिन कामकाज करताना अतिशय उपयोग होईल अशी भावना उपस्थित अभियंत्यांनी समारोपादम्यान व्यक्त केली.

## महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन विविध कार्यालयांत उत्साहात साजरा




**नागपूर :** नागपूर परिमंडळाअंतर्गत ''महापारेषण'' कंपनीचा ७ वा वर्धापन दिन जवाहर विद्यार्थी गृह नागपूर या ठिकाणी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून मा.डॉ. अंकुश धनविजय (भा.पो.से.) पोलीस आयुक्त नागपूर, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल संचालक (प्रकल्प) महापारेषण मुंबई तसेच मुख्य अतिथी म्हणून मा.श्री.अनिल खापर्डे प्रादेशिक कार्यकारी संचालक महावितरण नागपूर उपस्थित होते.

वर्तमान स्पर्धेच्या युगात आपल्या कामाचा दर्जा कायम ठेवून विद्युत पारेषण क्षेत्रात महापारेषण कंपनीने संपूर्ण देशात सर्वोच्च स्थान ग्रहण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता मा.श्री.एल.एस. सोनकवडे यांनी केले व आयोजन समितीचे सचिव तथा अधीक्षक अभियंता (स्था) श्री.एम.एच. चौहान यांनी आभार मानले.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनानंतर लगेच रक्तदान शिबीर तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकूण ३१ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले तसेच एकूण १०२ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आरोग्य तपासणी करून घेतली. रक्तदानाकरिता जीवनज्योती रक्तपेढी माधवनगर नागपूर तसेच आरोग्य तपासणीकरिता ''व्होकहार्ट'' हॉस्पिटल नागूपर यांच्या डॉक्टरांचे तसेच त्यांच्या स्टाफचे सहकार्य लाभले. सहभोजनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर दुपारी गीत व नृत्याचा सदाबहार मनोरंजनाचा कार्यक्रम पार पडला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजक श्री.विनयराज वाघमारे व सहकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाला मोठया संख्येने अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.



**सांगली :** महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन अउदा संवसु विभाग सांगली येथे उत्साहात साजरा झाला. सदर कार्यक्रमासाठी श्री.आर.डी. चव्हाण अधीक्षक अभियंता महावितरण सांगली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रथम प्रमुख पाहुण्यांचे हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम होऊन केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी श्री.मोहन भिसे कार्यकारी अभियंता, अउदा स्थापत्य विभाग सांगली, श्री.सी.एल. कोळी कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग सांगली, श्री.व्ही.ए. निकम प्रभारी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग सांगली, श्री.जंबू खोत, श्री.आशिष मेहता इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी वरील मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व कंपनीच्या प्रगतीमध्ये सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.आनंद घोरपडे सहा. अभियंता व श्री.अमोल मोहिते सहा. अभियंता यांनी केले.

या कार्यक्रमासाठी श्री.जी.टी. मुंडे मुख्य अभियंता, अउदा बांध नि.सं. व सु. परिमंडळ, कराड व श्री.के.डी. देशमुख अधीक्षक अभियंता अ.उ.दा. सं. व सु. मंडळ कराड यांचे मार्गदर्शन लाभले.

श्री.संदीप जाधव, उपकार्यकारी अभियंता यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदर कार्यक्रमास महापारेषण कंपनीच्या संवसु, स्थापत्य, बांधकाम, चाचणी व दूर संचरण विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन विविध कार्यालयांत उत्साहात साजरा




**ऐरोली :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा सातवा ''वर्धापन दिन'' महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली येथे थाटात संपन्न झाला. महापारेषण कंपनीच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वर्धापनदिनानिमित्त या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी ''आरोग्य मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, ठाणे'', यांचे मार्फत रक्ताच्या विविध चाचण्या, रक्तदाब तपासणी व इ.सी.जी. करण्यात आल्या व त्यांचे अहवाल त्या त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुपूर्द करण्यात आले.

यांप्रसंगी श्री.अशोक देशमुख यांचे 'तणावमुक्ती' या विषयावर व्याख्यान झाले. तणावमुक्त जीवन कसे जगावे, रोजच्या जीवनातील छोटया छोटया तणावाचे कशा प्रकारे निरसन करता येईल व निरोगी जीवनासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या याबाबत श्री.देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

विविध कला दर्शनाच्या कार्यक्रमात श्री.एस.डी. देवगुणे, श्री.ए.डी. दळवी व सौ.एम.एस. बापट यांनी गीत सादर केले. श्री.जे.आर. कुलकर्णी यांनी कथाकथन केले, श्री.जे.डी. तायडे यांनी स्वत:च्या नाटय लेखनातील काही प्रसंग व गीते सादर केली. श्री.सी.बी. डोके यांनी स्वत:चे आत्मचरित्र ''मी कसा घडलो'' या विषयावर कथा-कथन केले. श्री.एस.टी. शिंदे, मुख्य अभियंता यांनी सर्व कलाकारांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.व्ही.डी. पांडे यांनी विनोदी शैलीत केले.




**अंबाझरी :** भार प्रेषण केंद्र अंबाझरी कार्यालयात महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक परंपरा जतन करत कार्यालय रांगोळी, फुले व तोरणांनी सजविण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.०० वा. दीप प्रज्वलनाने करण्यात आली. या प्रसंगी श्री. अशोक लाडे, अधीक्षक अभियंता व श्री. सी.बी. सिंग माजी अधीक्षक अभियंता यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरण संवर्धनाच्या जाणिवेतून सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले.

यांप्रसंगी प्रा. अमर दामले यांचे 'दृष्टिकोनात्मक बदल' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच अनेक मनोरंजनात्मक खेळांमध्ये कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

संध्याकाळी संगीत रजनी कार्यक्रमांतर्गत 'स्वरसंगम' च्या चमूने सादर केलेल्या विविध सुरेल गीतांचा आस्वाद सर्व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी घेतला.

## सूचना

**महापारेषण समाचार साठी मजकूर पाठवताना तो कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत पाठवावा. छायाचित्रे दर्जेदार असावीत. मजकूर इंग्रजीत असल्यास तो ओपन फाईलमध्ये व मराठीत असल्यास पीडीएफ स्वरूपात खालील ई-मेलवर पाठवावा.**

**prohr@mahatransco.in**

# महापारेषण कंपनीचा ७वा वर्धापन दिन विविध कार्यालयांत उत्साहात साजरा






**कोल्हापूर :** कराड परिमंडलांतर्गत स्थापत्य मंडल आणि संवसु मंडल कोल्हापूर यांच्या वतीने महापारेषण कंपनीचा सातवा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री.ग.तु.मुंडे, मुख्य अभियंता, कराड यांनी भूषविले. या कार्यक्रमाला मा.श्री.रमेश घोलप, मुख्य अभियंता, महावितरण कोल्हापूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये कंपनीतील ६० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याप्रसंगी मा.अशोक देशमुख यांचे 'ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. हे व्याख्यान अतिशय उपयुक्त असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी नोंदवली. यावेळी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले.

वरील कार्यक्रमास अधीक्षक अभियंते श्री.पी.एस.साळे, श्री.एस.एम. चिंचवाडकर, श्री.एम.जे. पटेल, श्री.के.डी. देशमुख व कार्यकारी अभियंते श्री.हाके, श्री.भिसे, श्री.जोशी, श्री.बल्लाळ, श्री.पिचे, श्री.ढापरे सौ. साळे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी परिमंडलातील अभियंते व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

**अमरावती :** अमरावती परिमंडळात महापारेषण कंपनीच्या ७व्या वर्धापन दिनाचा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अमरावती परिमंडळ कार्यालयाच्या परिसरात या सोहळयाचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.गजभिये, प्रभारी मुख्य अभियंता अउदा बांधकाम निसंवसु परिमंडळ अमरावती हे होते. अतिथि म्हणुन अधीक्षक अभियंता श्री.वामन खाडे, श्री.दीपक रोकडे आणि श्री.अनिल वानखुडे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून प्राध्यापक श्री.आनंद देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला केक कापून कंपनीचा वर्धापन दिन साजरा करण्याचा उद्देश विषद करण्यात आला. प्रमुख वक्ते प्राध्यापक श्री.आनंद देशमुख यांनी परिमंडळ कार्यालयातील कर्मचाऱ्यांना ''तणाव व्यवस्थापन'' या विषयावर अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. ७वा वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम देखील करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) तसेच श्री.प्रफुल्ल अवघड, कार्यकारी अभियंता (प्रशासन) व श्री. युनुस शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.



## सुनिल एकनाथ शिंदे यांना पी.एच.डी. प्रदान

अउदा बांधकाम मंडळ म.रा.वि. पारेषण कंपनी, औरंगाबाद या कार्यालयात शिपाई म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती सुमन एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्री. सुनील एकनाथ शिंदे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्राणिशास्त्र या विषयात पी.एच.डी. प्रदान केली आहे. सुनिल शिंदे यांनी ''हायड्रोबायोलॉजिक स्टडी ऑफ हर्सुल-सावंगी डॅम इन रिलेशन टु पोल्युशन'' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. डॉ.डी.एन. सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. शिंदे यांचे २८ शोधनिबंध अंतरराष्ट्रीय पातळीवर आणि ४ शोधनिबंध राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल महापारेषण कंपनीतर्फे त्यांचे अभिनंदन.

# गौरव



## कु. संकेत भगतचे आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत यश

प्रमुख भांडार 'क' बारामती या कार्यालयात, कार्यरत असलेले कनिष्ठ तंत्रज्ञ श्री.प्रसन्ना धर्मा भगत यांचा मुलगा कु. संकेत प्रसन्ना भगत वय १३ वर्षे याने पोखरा (नेपाळ) येथे २७ मे २०१२ ते ३० मे २०१२ या कालावधीत नेपाळ शितो रियु कराटे बागर डोजो या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सहभागी होऊन रौप्यपदक प्राप्त केले आहे. या स्पर्धेत भारतासह विदेशीतील ५०० पेक्षा अधिक खेडाळू सहभागी झाले होते. या यशाबद्दल महापारेषण कंपनीतर्फे त्याचे अभिनंदन.

## हसरे पत्र



**तीर्थस्वरूप ट्रॉन्सफॉर्मर आजोबास**

कु. सिटीचा स.न.वि.वि. पत्राचे प्रयोजन असे की, बरेच दिवसांपासून तुमच्याकडील हालहवाल कळला नाही. तुम्ही कसे आहात? पारेषणकर परिवाराचे तुम्ही आधारस्तंभ आहात. तुमच्यावर आम्ही सर्व अवलंबून आहोत. तुम्ही ऊन, वारा, पाऊस झेलून आम्हा सर्वांना सांभाळून घेता. दिवसेंदिवस तुमची प्रकृती सुधारत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. तेव्हा तुम्ही जास्त करून कुलरमध्येच राहत जा. तसेच तुम्हाला गॅसेसचा सुद्धा त्रास आहे. गॅसेस वाढल्यावर तुमचा बी.पी. (बुकोल्झ प्रेशर) वाढतो. तेव्हा वरचेवर डॉक्टरकडे जाऊन सर्व टेस्टिंग करून घ्या. सोबतच दररोज तेलाने मालिश करीत जा.

काळजीची गोष्ट म्हणजे गं.भा. बीओसीबी, एमओसीबी व ओसीबी या तीनही आत्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत आहे. त्यावर उपचार सुरु आहे. त्यामुळे ओसीबी आत्याच्या दोन मुली कु. जीसीबी व कु. बीसीबी या तिघींची काळजी घेत आहे. ह्या दोघीही चांगल्या तल्लख बुद्धीच्या असून पारेषणकर परिवारास हातभार लावून खूप मदत करीत आहे.

आजोबा, मी सर्व शेजाऱ्यासोबत मिळून मिसळून रहात असल्यामुळे सर्वजण माझ्यावर खूप प्रेम करतात. माझी मोठी बहिण कु. पिटी ही फारशी कुणाशी मिसळत नाही. ती एकदम वेगळीच राहते. असो!

आजोबा, आनंदाची गोष्ट म्हणजे, रिले कुमारसोबत माझं लग्न जुळलं, कालच साक्षगंध झालं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सर्व भाऊ फारच सेंसिटिव्ह आहेत. माझी होणारी एकुलती एक नणंद कु. ॲम्पीअर चे तिच्या शेजारीच राहणाऱ्या चि.व्होल्ट सोबत जोरदार प्रेमप्रकरण सुरु होतं. दोन्ही घरचा विरोध होता. परंतु श्री.वॅट भाऊजीने मध्यस्थी करून त्यांचं लग्न लावून दिलं.

आजोबा, तुमचा नातू, म्हणजे माझा लहान भाऊ चि. आयसोलेटर हा विक्षिप्त वागतो. शेजाऱ्यांशी कधी मिसळून तर कधी दुरावा करुन राहतो. श्री.चार्जर दादा व सौ. बॅटरी वाहिनीचं लग्न झाल्यापासून एकमेकांशी पटत नसल्यामुळे सौ. बॅटरी वहिनी आपला मुलगा चि. सेल कुमार सोबत वेगळी राहते. अडीअडचणीच्या प्रसंगी चार्जर दादा बॅटरी वहिनीची मदत करतो.

आजोबा श्री. अउदा काकांच्या दोन्ही मुली कु. एचटी व कु. एलटी चे लग्न एकाच वेळी जुळलं कु. एचटी ला महापारेषणकर व कु. एलटी ला वितरण परिवारात दिलं. पुढल्या महिन्यात एकाच मांडवात दोघींचे लग्न आहे.

जास्त काय लिहू?

चि. फ्युज, कु. ग्रिप, चि. एलअे, कु. इन्सुलेटर ला गोड गोड पापा

श्री. केबल काका व सौ. वायर काकूस नमस्कार सांगणे तसेच श्री.बुशींग दादा व सौ. अतिउच्च दाब वहिनीस नमस्कार.

पत्र मिळताच ब्रेकर दादाच्या हाताने याचे उत्तर पाठवा.

तुमची नात

**कु. सिटी रोहित्रे**

विद्युत नगर, पारेषण कार्यालय जवळ, फिडरपूर, जि. वीजपूर

**नितीन कांडळकर**

सहा. यंत्रचालक, ६६ केव्ही, भारसिंगी उपकेंद्र, नागपूर

## भ्रमणध्वनी : शाप की वरदान?

भ्रमणध्वनी (मोबाईल) याच्या नावातच याचा अर्थ अभिप्रेत आहे. फिरता आवाज, आपल्या अवती भोवती फिरणारे नाद (आवाज) आहेत ते भ्रमणध्वनीचे. झोपडीपासून ते महालापर्यंत आज तो प्रत्येकाच्या हातात दिसतो. असा ह्याचा सर्वत्र वापर आहे.चालताना, बोलताना, प्रवासात, घरोदारी, सर्वजण मोबाईलवर बोलताना आढळतात. थोडक्यात आजच्या घडीला त्याच्याशिवाय कोणाचेच पान हलत नाही.

खरं पाहता या मोबाईलमुळे सर्व जग जवळ आलेलं असून खऱ्या अर्थाने ''वसुधैव कुटुंबकम'' ची जाणीव झालेली आहे. मोबाईलच्या ह्या सर्वत्र वापरामुळे सर्वांची कामे चुटकीसरशी होऊ लागली आहे. सध्या तो जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. लहान मुलांपासून ते मोठया माणसापर्यंत सर्वांनाच मोबाईलचे अतिशय वेड आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे मोबाईलमध्ये बऱ्याच सोयी उपलब्ध आहेत. उदा. कॉम्प्युटरची सर्व फंक्शन्स, गाणी, मेसेजेस पाठविणे वगैरे-वगैरे. जगातील कुठल्याही माणसाशी क्षणार्धात आपण मोबाईलद्वारे संपर्क करू शकता. आधुनिक युगातला तो एक चमत्कारच म्हणावा लागेल. याचे फारच फायदे आहेत. पोलिसांसाठी ते एक वरदानच आहे. आजकाल पोलीस याच्या मदतीने गुन्हेगाराला शोधून काढू शकतात.

मोबाईलचे जेवढे फायदे आहेत तेवढेच त्याचे तोटे सुद्धा आहेत. मोबाईलच्या वापरामुळे होणारे तोटे कधीही न भरून निघणारे आहेत.

सतत मोबाईलवर बोलण्यामुळे हळूहळू कान व मेंदूवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येते. गेल्याच महिन्यात वर्तमान पत्रात एक बातमी वाचनात आली व मी एकदम सर्दच झाले. कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलाने गाणी ऐकण्याकरिता कानांना हेड फोन लावला होता व त्याच तंद्रीत तो रेल्वेलाईन क्रॉस करीत असताना गाडीचा हॉर्न व त्याला वाचविण्यासाठी आजूबाजूच्या लोकांनी केलेला ओरडा त्याला ऐकू आला नाही व तो गाडीखाली चिरडून गतप्राण झाला. ही बातमी वाचून मन एकदम विषण्ण झाले. त्याचप्रमाणे गाडीत, बसमधे, रस्त्यावर, चालताना आपणांस असे आढळून येते की बरेचजण मोबाईलवर खोटे बोलताना दिसतात. प्रेमिकांना मोबाईल एक वरदानच ठरले आहे. ज्यामुळे बरचे अनर्थ सुद्धा घडतात.

हे जरी सर्व खरे असले तरी मोबाईल आजच्या काळाची गरज आहे. हे एक आधुनिक तंत्रज्ञानाचे उत्कृष्ट प्रतीक असून आजच्या युगाला मिळालेलं ते एक वरदान आहे.

**सौ. कस्तुरी सावंत**

उप व्यवस्थापक, भांडार देयक विभाग,

सांघिक कार्यालय, मुंबई

## नियंता

आपण कोणताही चित्रपट पाहण्यापूर्वी पडद्यावर कलाकार, दिग्दर्शक व निर्माता अशी नावे वाचतो व नंतर सिनेमाला सुरुवात होते. मग या ब्रह्मांडांचा निर्माता कोण अर्थातच परमेश्वर. त्याचे स्वरूप वेदांना देखील कळले नाही. जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी अणू-रेणूत प्रत्येक प्राणीमात्रात तो भरलेला आहे. निर्गुण निराकार आदी मी अनंत मी अशा स्वरूपात त्याचे वर्णन केले जाते. मानवी जीवनात श्रद्धा, भक्ती व प्रेमभावनेचे महत्व फार असल्यामुळे आपण परमेश्वराचे घराघरात मनोभावे पूजन करतो व गावागावातील मंदिरे, मशीद, चर्च गुरुद्वार याची ग्वाही देतात.

भरती-ओहोटी, ग्रहणे, दिवस-रात्र, हिवाळा-पावसाळा-उन्हाळा पृथ्वीचे भ्रमण, भूकंप, ज्वालामुखी, वादळे, उल्कापात या साऱ्या बाबी सुरळीत चालूं असतात. याखेरीज ग्रह, ज्यांच्या भ्रमणाचा पृथीवरील समस्त प्राणीमात्रांवर, पशुपक्षांवर आणि अगदी वनस्पतींवर देखील अमल असतो असा तो सर्वशक्तीमान भगवान श्री परमेश्वर की ज्याने आपले विराट विश्वरूप दर्शन आपल्या आई-वडिलांना देखील न दाखविता आपल्या लाडक्या भक्ताला म्हणजे अर्जुनाला दाखविले व अर्जुनदेखील या रूपाने भयभीत झाला व हेच खरे परमेश्वराचे स्वरूप आहे. देव हा भावाचा व प्रेमाचा भुकेला असतो.

वेळोवेळी मानव जातीसाठी पृथ्वीच्या रक्षणासाठी भगवंतांनी त्या त्या काळानुरूप अवतार घेतले. सज्जनांचे रक्षण करून दुर्जनांचा नाश केला. सध्या परमेश्वराचा या कलियुगात कलंकी अवतार आहे. सध्या कलि फार प्रबळ झाला असून त्याचे वर्चस्व आपण एकंदरीत परिस्थितीत पाहतोच आहे. कलियुगाचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास 'कोण कुणाचा नाही जगती. संकट समयी सोडूनी जाती. बाळपणीचा मित्र परंतु वेळप्रसंगी म्हणणे कोण तू ? प्रिया असता सवे भोवती, माता होता मारी लाथा, पैसा असता सवे भोवती, गरीब होता कोणी न पुसती' असे आहे.

कलियुगाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ईशप्राप्ती लवकर होऊ शकते. पूर्वी आयुर्मान देखील जास्त होते. त्यामुळे पूजा-अर्चा, तपश्चर्या खूप काळ करावी लागत असे. आता थोडा वेळ जरी एकाग्रतेने ईशचिंतनात मोडलात तरी भगवंत प्राप्त होऊ शकतो. आपल्या भारतभूमीत साधु-संत, ऋषी-मुनी, थोर न्यायी राजे पूर्वी होऊन गेले व त्यांची शिकवण आपण जर पाळली तर आपणाला निश्चितच सुख-समृद्धी व सौख्य लाभेल. मूलतः ईश्वरी तत्त्व एक आहे. वेगवेगळ्या पंथानुसार कोण राम, कृष्ण, विष्णू, शंकर आदिंची उपासना करतात, पाश्चात्यांनी देखील भारतीय संस्कृतीची प्रशंसा केली आहे. श्रद्धा असावी. मात्र अंधश्रद्धा नसावी.

जीवनातल्या समस्या सोडविण्यास ईश्वरनाम - ईश्वरचिंतन हेच रामबाण औषध आहे. चिंता करण्यापेक्षा चिंतन करणे केव्हाही चांगले. कारण जगात ज्या ज्या गोष्टी घडतात त्या परमेश्वराच्या इच्छेनुसार घडतात. त्यामुळे आपण आंनद वा खेद व्यक्त न करता चांगली कर्म-कार्ये करीत राहणे. यासाठीच योगी लोक अलिप्तता, तटस्थता व मौन आचरणात आणतात. 'आलात स्वागत असो बसलात आनंद आहे. चाललात समाधान वाटले, कारण गुंफलात ते धागे वाहतात ते अश्रू भेटतात त्या 'स्मृती' असे आपले सर्वांचे जीवन आहे.

आपण सारे प्रवासी आहोत. मनुष्य मात्र पैसा, दागिने, इस्टेट, प्रतिष्ठा या मायाजालात गुरफटून सदा अहंकारात वावरत असतो. येथे सारे क्षणिक आहे. आजचे उद्या नसते. विशाल सागरासारखी वृत्ती अंगी बाणवून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत त्याच्यात काही फरक पडत नाही. माणसात मात्र बदल झटकन घडतात. म्हणूनच म्हणतात, 'नशीबाने फार चांगले दिवस आले तरी फार शेफारून जाऊ नका. नशीबाचे चक्र केव्हाही फिरू शकते हे कधीही विसरू नका'.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे आजचे जीवन पद्धतीतील टप्पे आहेत. परमेश्वराची उपासना, सेवा करणे म्हणजे नेमके काय करायचे, जपमाळ ओढीत बसायची की भजन-कीर्तन करीत बसायचे ? की सर्व सोडून म्हणजे कुटुंबिय नोकरी धंदा वगैरे सोडून जंगलात एकांत स्थळी जायचे यातील कशाचीही बिल्कुल गरज नाही. 'तुझं आहे तुजपाशी.'

सर्वांशी प्रेमाने वागा. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' या नात्याने त्यांना आपुलकी द्या. षडरिपूंवर मात करण्याचा प्रयत्न करा. कुणावर अन्याय करू नका. कुणाच्या कार्यात अडथळे आणू नका. सच्चपणाने व न्यायाने वागा. अधिकाराचा गैरवापर करू नका. सत्कर्मे व प्रभुनाम यांची कास धरा. मातृ-पितृ ऋणाप्रमाणे समाज व देश यांचे देखील आपण देणे लागतो. ही जाणीव ठेवून वर्तणूक ठेवा. माणुसकी हीच खरी ईश्वर पूजा आहे. याखेरीज जिद्द स्वावलंबन, वेळेचा सदुपयोग, सत्प्रवृत्तीवर विश्वास, न्यूनंगडाचा अभाव, परिस्थिती हाताळण्याचे तंत्र व कसब, प्रभावी व्यक्तिमत्वाची कास, व्यायाम, ध्यानधारणा, आत्मविकासासाठी शवासन, समतोल आहार, भोजन व मनोरंजनाचे मानवी जीवनातील महत्त्व, सातत्य अतिरेकी वृत्ती टाळणे, वाचन, अंधश्रद्धेवर अविश्वास, मोह व दुष्ट प्रवृत्ती टाळणे, निःस्वार्थीपणा इ. गुण अंगीकारल्यास अथवा जोपासना केल्यास 'नियंता' आपल्या पाठी सदैव उभा राहील हे निश्चित.

**श्रीपाद ना. नाटेकर**
नि.लि., स्थापत्य विभागीय कार्यालय,
ओगलेवाडी, कराड

---

## गौरव



### कल्याणी गट्टेवारचे माध्यमिक शालान्त परीक्षेत यश

एचव्हीडीसी चाचणी व दुरभाव विभाग, चंद्रपूर येथे कार्यरत असलेले वाहन चालक श्री.व्ही.एम. गट्टेवार यांची सुकन्या कु.कल्याणी विनोद गट्टेवार ही मार्च २०१२ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत ९३.४५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली. तिच्या या उज्ज्वल यशाचे श्रेय तिने आई-वडील व शिक्षक वर्गाला दिले आहे. या यशा बद्दल तिचे महापारेषण कंपनी तर्फे अभिनंदन.

लेख

## मन उधाण वाऱ्याचे...



मन हा एक मानवाचा अतिशय महत्वाचा असा अदृश्य अवयव आहे. ह्याचा वेग वाऱ्यापेक्षाही जास्त आहे. म्हणूनच बहिणाबाई म्हणतात, ''मन पाखरू पाखरू, आता होतं भुईवर, गेलं गेलं आभायात'' या मनाची व्याख्या करायची म्हटलं तर अनेक भावभावनांचा गुंता, तसेच अनेक आचारविचारांचा साठा म्हणजे मन असे म्हणता येईल. व्यक्ती तितक्या प्रकृती असं म्हणतात त्यामुळे जितक्या प्रकृती तितकी मने असे म्हणायला काही हरकत नाही.

स्त्रीला जेव्हा प्रथम मूल होणार असे कळल्यावर तर तिच्या मनाची अवस्था म्हणजे 'मन उधाण वाऱ्याचे' अशी झालेली असते. तिला भोवतालच्या अनेक स्त्रिया अनेक सल्ले देत असतात पण 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या प्रमाणे ती तिच्या मनाला जे योग्य वाटेल तेच करते. ती तिच्या पोटातील गर्भाशी इतकी एकरूप झालेली असते की तिला भोवतालच्या जगाचं भानच राहत नाही. ती सतत आपल्याला होणाऱ्या बाळाचा विचार करत असते. आपल्याला मुलगा होईल की मुलगी, मुलगा झाला तर सगळयांनाच आनंद होईल पण मुलगी झाली तर सगळे आनंदी होतील का? याबद्दल साशंक असते. परंतु तिचा पती तिला समजावत असतो की काहीही झाले तरी आपले मूल आनंदच देईल सगळयांना. आपण त्याचे उत्तम तऱ्हेने स्वागत करू. अगं त्याच्या येण्याने नवीन नाती निर्माण होतील. कधी कधी तर त्या युगुलात मुलाला कुठच्या प्रकारचे शिक्षण द्यायचे, त्याला कोणत्या शाळेत घालायचे म्हणजे त्याचा चांगला विकास होईल याबाबत स्वप्नांचे मनोरे रचतात.

हे गूढ मन अतिशय संवेदनशील असते. आजच्या काळाची गरज म्हटले तर मनाचा मनाशी सुसंबंध जुळणं फार गरजेच आहे. आपण बऱ्याच वेळा ऐकतो की अगदी लहान वयात मुले किंवा मुली आत्महत्या करतात. कुणी प्रेमभंग झाला म्हणून तर कुणी अपयशी झाला म्हणून अशी वेळ आल्यानंतर नशिबाला दोष देऊन किंवा आपले काय चुकले ह्याचा विचार करून काहीही उपयोग नसतो. त्यापेक्षा ''पुढच्याला ठेच मागचा शहाणा'' या म्हणीप्रमाणे आपल्या पुढील पिढीशी चांगल्या प्रकारे सुसंवाद साधला पाहिजे. त्यांच्या गूढ मनात असणाऱ्या शंकाकुशंकांचे निवारण करणे पालकांचे कर्तव्य आहे. समजा मूल अपयशी झाले किंवा त्याच्या हातून कळत नकळत एखादी चूक झाली तर त्याला न रागावता अतिशय हळूवारपणे त्यांना समजवावे. त्यांच्यात पुढे जाण्याची जिद्द निर्माण करावी. पण बऱ्याच वेळा मुलं त्यांच्या मित्रमैत्रिणींशी मनमोकळया गप्पा मारतात. त्याबाबतीत ते पालकांना काहीही सांगत नसतात. पण पालकांनी त्यांना समजून घ्यायला हवं कारण मैत्रीचं नात ही प्रत्येकाच्या गूढमनाची गरज असते. त्या नात्याबद्दल काही बोलण म्हणजे गूढ मनाची प्रतारणा होईल मुलांवर शिक्षण लादण्यापेक्षा त्यांना मनापासून जे शिक्षण घ्यावेसे वाटेल ते द्यावे त्यामुळे त्यात यशस्वी होण्याचा ते नक्कीच प्रयत्न करतील. पुढे ते त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कार्यरत होतील. आणि आपल्या माता-पित्यांना सुखी ठेवतील त्यांना कधीही अंतर देणार नाहीत.

माणसाचे मन म्हणजे पाण्यासारखे तरल असते जसे पाण्यात एखादा रंग मिसळला तर ते पाणी त्या रंगाचे होते. तसेच मनाचे असते. मना - मनाची तार जुळते असे आपण म्हणतो. हया मनावर राज्य असते ते विचारांचे, ते भूत, भविष्य, वर्तमान कोणत्याही काळातील चांगले अथवा वाईट अनेक प्रकारचे अनुभव सत्यासत्य वाटणाऱ्या गोष्टी, सुसंगतीचे अथवा कुसंगतीचे परिणाम असे सर्व प्रकारचे विचार इथे अधिष्ठित असतात प्रसंगानुरूप ह्या मनातील विचार कार्यान्वित होत असतात म्हणून हे मन कसं असावं याबद्दल संत तुकाराम म्हणतात ''मन शुद्ध तुझं गोष्ट आहे पृथ्वीमोलाची। तू चाल पुढं तुला रं गडया भीती कुणाची।।'' पण मनाची शुद्धता साधणे प्रत्येकाला जमणे शक्य आहे का? तसे पाहिले तर जगात अशक्य असे काहीच नसते. स्वत:च्या मनाचा प्रामाणिकपणा सांभाळणे कुणालाच अवघड नसते. ते सोपे करण्यासाठी रामदास स्वामींनी सांगितले आहे, ''मना सज्जना भक्तींपंथेची जावे, तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे, जनी वंद्य ते सर्व भावे करावे।'' किती सुंदर उपदेश केलेला आहे. हे गूढ मन कितीही चंचल असले तरी ते जेव्हा परमेश्वराचा आशीर्वाद घेते तेव्हा सारे मंगलच होते.

**सौ. निशा श्री. घमंडे,**
दूरध्वनी चालक
अउदा, संवसु विभाग डोंबिवली

---

गौरव



### चि. मंदार ज. पत्की याचे शालान्त परीक्षेत सुयश

चि. मंदार जयंत पत्की याने इयत्ता १०वी मध्ये ९५.२७% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. चि. मंदार हा चाचणी विभाग, लातूर अंतर्गत चाचणी उपविभाग बीड येथे कार्यरत असलेले उप-कार्यकारी अभियंता श्री.जयंत राजाराम पत्की यांचा सुपुत्र आहे. त्याचे महापारेषण कंपनीतर्फे हार्दिक अभिनंदन.

---



### कु. रश्मी ज. पत्की हिचे उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत यश

कु. रश्मी ज. पत्की हिने मार्च २०१२ मधील इयत्ता १२वीच्या परीक्षेत ९४.१७% गुण मिळवून यश संपादन केले. कु. रश्मी ही चाचणी विभाग, लातूर अंतर्गत चाचणी उपविभाग बीड येथे कार्यरत असलेले उप-कार्यकारी अभियंता श्री.जयंत राजाराम पत्की यांची कन्या आहे. तिचे महापारेषण कंपनीतर्फे हार्दिक अभिनंदन.

## खेळतेपणातलं जाणतेपण



सहस्त्ररश्मीच्या किरणांनी पुणे विद्यापीठ चौकाच्या स्पोर्ट ग्राऊंडवरच्या मातीचा कण्न् कण सुवर्णमयी भासत होता. साऱ्या खेळाडूंचे चैतन्य त्यात मिसळले होते. वेगवेगळया ड्रेसमधल्या खेळांडूच्या हालचाली विविधरंगी फुलपाखरांसारख्या भासत होत्या. बाजूला उद्घाटनाच्या सभामंडपाचा शामियाना विविधरंगी इंद्रधनुच्या कमानीसारखा चमकत होता. विविध खेळांसाठी पांढऱ्या चुन्याच्या रेघा, व रिंगणे वातावरणात देखणेपण आणत होती. प्रथमोपचारासाठी डॉक्टर्स, हातात फायली घेऊन फिरणाऱ्या संयोजकांची लगबग, व्हॉलीबॉलच्या जाळया ओलांडून जाणारी किरणे, लांब उडयासाठी टाकण्यात आलेल्या स्पंजच्या मॅटला भेदणारी किरणे, सारे वातावरणच भारून टाकणारे होते.

रनिंगचा राऊंड सुरु झाला दोन्ही बाजूला पेक्षकांचे मोठेसे रिंगण पडले होते. टुर्नामेंट राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीची असल्याने सात झोनच्या सात महिला खेळाडू सप्तरंगी वेषामध्ये सज्ज होत्या. प्रेक्षकांचे श्वास रोखले गेले होते.

स्टार्ट म्हणताच मुली धावू लागल्या. मी नाशिक झोन महिलांची टीम लीडर होते. त्यातली संध्या गीते या ग्राऊंडमध्ये विद्युत वेगाने धावू लागली. संध्या, संध्या, संध्या नाशिकमधल्या इतर प्रेक्षक खेळाडूंच्या आवाजात माझाही आवाज सामील झाला. त्या उत्साहाने भारलेल्या वातावरणात संध्या जसजशी साऱ्यांना मागे टाकून पुढे पुढे येऊ लागली तस तसे वय विसरून टाळया पिटत मी ही उडया मारत संध्या, संध्या म्हणून ओरडू लागले.

संध्या विजयी होऊन पुढे आल्यावर आनंदाने घट्ट बिलगली, उसासे टाकू लागली. आम्हाभोवती साऱ्यांचे रिंगण पडले. सारेजण सभोवती जमून अभिनंदनाचा वर्षाव तिच्यावर करू लगाले. समोरच आमचे साहेब उभे होते. मी हात धरून तिला त्यांच्याकडे नेले. त्यांनी मनापासून तिचे कौतुक केले.

खरं तर क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी असे मोठे मोठे सामने आमच्या नाशिक झोनच्या हातातून निसटून गेले होते. सगळयांचा मूड गेलेला. पण संध्याने एका मागून एक बाजी मारत अनेक सामने विजयी रूपाने नाशिक झोनच्या पदरात घातले. पुन्हा चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. साऱ्यांचे चेहरे पुन्हा उजळले. भारती वांडरे (रनिंग) अलका कुलकर्णी (टेबल टेनिस) यांनी विजयाच्या पताका रोवल्या.

संध्या मात्र सगळयांच्या चांगलीच लक्षात राहिली होती. लांब उडी, उंच उडी मध्येही तिने बाजी मारली होती. खरं तर लांब उडीचे टेक्निकल ट्रेनिंग इतर झोनच्या लेडीजना होतं. संध्याला कुठलंही प्रशिक्षण नव्हतं पण ती शेतकरी कुटुंबातील एक काटक मुलगी मात्र होती. तीन चार दिवसांच्या साध्या प्रॅक्टिसने आणि आत्मविश्वासाने तिनं हे यश मिळवलं होतं.

संध्या रहात असलेल्या गावी फक्त चौथीपर्यंत शिक्षणाची सोय असल्याने पाचवी नंतर बी.सी.एस. फस्ट ईयर व आय.टी.आय. पर्यंतचं पुढचं सगळं शिक्षण तिनं परळीसारख्या गावात जाऊन-येऊन पूर्ण केलं होतं. तिच्या घरात इतकं शिक्षण घेणारी ती पहिलीच मुलगी होती. आईवडिलांची इच्छा आणि प्रोत्साहन इतकंच बळ तिच्याबरोबर होतं.

आय.टी.आय. नंतर संध्या पारेषण कंपनीमध्ये रूजू झाली. आज बहिणीला घेऊन एकलहऱ्याला एकटी क्वार्टर घेऊन ती राहत आहे. तिच्यासारखीच रनिंग १०० मीटर मध्ये पहिली आलेली भारती वांडरे सिन्नरच्या क्वार्टरमध्ये तर जया कांबळे एकलहऱ्याच्या क्वार्टर मध्ये या ऑपरेटर मुली आत्मविश्वासाने राहतात. ज्युनिअर टेक्नीशियन किंवा ऑपरेटर असलेल्या हया मुली ट्रान्स्फॉर्मरचे रिडींग घेणे अशी कामे करतात. तसेच शिफ्ट ड्युट्या देखील करतात. अनुभव माणसाला जगण्यातला आत्मविश्वास देतो. परिस्थिती नुसतं जगायला नाही तर लढायला शिकवते. ह्या मुली आयुष्याचा स्ट्रगल हा खेळासारखा मानतात. त्या जगण्याच्या इच्छेमध्ये आत्मविश्वास मिळवून आयुष्याच्या मैदानात उतरल्या आहेत. त्यामुळे त्यांना परिस्थितीशी झुंज देण्यासाठी जास्त प्रॅक्टिस करावी लागली नाही. परिस्थिती माणसाला लढण्याचं, जगण्याचं बळ देते. याप्रसंगी मला कविता राऊत आठवते. अशा कितीतरी कविता राऊत कितीतरी खेडयांमध्ये असतील. कुणीतरी बोट धरून पुढे आणण्यासाठी वाट पाहत असतील. त्या धावायला लागल्या की त्यांना क्षितीज कमी पडेल. गरज आहे ती त्यांना हात देण्याची.

**सौ. शारदा गायकवाड**
अ.उ.दा. बांध. नि. संवसु. परि. नाशिक

---

## गौरव



### सीईटी परीक्षेत गौरव ईसलवारचे घवघवीत यश

नांदेड: महापारेषण कंपनीच्या जंगमवाडी नांदेड येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रातील वरिष्ठ यंत्रचालक श्री.एस.एस. ईसलवार यांचा मुलगा चि. गौरव शिवाजी ईसलवार हा नुकत्याच झालेल्या एम.एच.टी.सी.ई.टी. परीक्षेत अनुसूचित जमातीतून महाराष्ट्र राज्यात पहिला आला आहे. याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नुकत्याच झालेल्या बारावीच्या परिक्षेत गौरवला ९१ टक्के गुण मिळाले आहेत. आय.आय.टी./ जे.ई.ई. या परीक्षेत तो अनुसूचित जमातीतून भारतात १०१९ क्रमांकावर आला आहे. ए.आय.ईईई परीक्षेत गौरवने राज्यात १९ वा क्रमांक प्राप्त केला आहे. त्याचा या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. गौरवच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## अक्षरधाम मंदिरः एक चमत्कृती

आम्ही सर्व मैत्रिणींनी ठरविल्याप्रमाणे नैनिताल - मसूरी - हरिद्वार - ऋषिकेश ट्रीपला जाण्यासाठी न्यू दिल्ली एअरपोर्टला उतरले व एका हॉटेलमध्ये आलो. थोडयाशा विश्रांतीनंतर ठरलेल्या कार्यक्रमानुसार दिल्लीतील ''अक्षरधाम मंदिर'' पाहण्यास सर्वजणी संध्याकाळी ४ वाजता पोहोचलो.

हे मंदिर यमुना नदीकिनारी बांधलेले आहे. अक्षरधाम मंदिरात श्री.स्वामी नारायण मूर्तीची स्थापना केलेली असून मूर्ती प्रचंड आहे. मंदिर परिसर अफाट असून तिथे मोबाईल, कॅमरे नेण्यास मज्जाव केलेला आहे. सर्व सुरक्षा तपासण्या पार करून आम्ही मंदिरात प्रवेश केला. आणि मंदिराची भव्यात पाहून आमचे डोळे विस्फारले. तेथील स्वच्छता व नीटनेटकेपणा अवर्णनीय आहे.

संपूर्ण मंदिर हे भव्यदिव्य आहे. मंदिराच्या दरवाजांना सोन्याचा मुलामा देवून कलाकुसरीने सजविले आहेत मंदिराच्या आतमधे भिंतीवर त्याप्रमाणे छतावर कळसावर जिथे आपली सहज नजरही पोहोचत नाही तेथे उत्कृष्ट कलाकुसर व नक्षीकाम केलेले आढळते. त्या कलाकुसरीत निसर्गातील देव-देवता, पौराणिक प्रसंग, ऋषीमुनी, फळे-फुले, प्राणी-पक्षी चितारून या सर्वांची उत्तमरित्या सांगड घातलेली आढळते. खरोखरच डोळयांचे पारणे फिटते व अत्यानंद होतो. अशा या मानवनिर्मित कलाकृतीपुढे आपण सहजच नतमस्तक होतो.

मंदिराच्या आतील कलाकुसर व नक्षीकाम तसेच स्वच्छता पाहून आपले पाय तेथेच थबकतात. परंतु वेळेचे भान ठेवावेच लागते. त्याप्रमाणे आम्ही बाहेर येऊन मंदिराला प्रदक्षिणा घालावयास सुरुवात केली तर बाहेरील कलाकुसर पाहून आम्ही अचंबित झालो. ती सर्व दृष्य अवर्णनीयच होती. एका मागोमाग एक सर्व दृष्य चितारली होती. त्यामध्ये हत्तींचे कळप त्याचप्रमाणे वाघ, सिंह, हरणे, कोल्हे, अस्वले तसेच मोर, पोपट, कबूतरे व इतर पक्षी अतिशय सुंदररित्या कोरलेले आढळले. असे हे नानाविध आकृत्यांनी सजलेले विहंगम दृश्ये आम्हा सर्व मैत्रिणींना खूप आवडले.

एक विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे अशातऱ्हेने २ ते ३ किमी. मंदिर परिसर फिरण्यासारखा आहे. तेथील लेझर शो पाहण्यासारखा असतो. सूर्यास्ताच्या वेळी मंदिराच्या मागील बाजूस हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. एका प्रचंड हौदाच्या मधोमध खाली कारंजी आहेत. व चहूबाजूनी बसण्यासाठी वरपर्यंत दगडाच्या पायऱ्या बांधल्या आहेत. तिथेच सर्व लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात येते. ब्रम्हा, विष्णू व महेश यांच्या आवडत्या वाद्यांचा वापर करून (उदा. वीणा, डमरू वगैरे) संस्कृत श्लोकावर आधारित रंगीत प्रकाशाने कारंजातील पाण्याचा वापर करून उत्पत्ती, स्थिती व लय यांचा मनोहारी दृष्यांचा नजराणा पेश केला जातो.

ते दृष्य पाहताना अंग रोमांचित होते. क्षणाक्षणाला वेगवेगळी विहंगम दृश्ये साकार होतात व टाळयांचा कडकडाट होतो. असे हे नयनरम्य दृश्य सुमारे २० ते ३० मिनिटे दाखविले जाते. पाहणारे सर्वजण थक्क होतात व मंत्रमुग्ध होऊनच बाहेर पडतात.





आम्ही सर्वजणी निघताना रात्रीचे ९ वाजून गेले होते. ५ ते ६ तास फिरल्यावर आम्ही सर्वजणी थकलो होतो. परंतु पाय व मन मंदिरापासून बाजूला होत नव्हते. मन फिरून फिरून तेथेच रुंजी घालत होते. आम्ही सर्वजणी धन्य झालो होतो. आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

मला असे आवर्जून सांगावेसे वाटते की प्रत्येकाने अक्षरधाम मंदिर आयुष्यात एकदा तरी अवश्य पाहावे. अशी कलाकृती ज्या कारागिरांनी घडविली व आजपर्यंत व्यवस्थित जतन केली त्या सर्वांना माझा शतशः प्रणाम.

।। जय स्वामीनारायणः जय अक्षरधाम ।।

**सौ. कस्तुरी सावंत**
उप व्यवस्थापक, भांडार देयक विभाग,
सांघिक कार्यालय, मुंबई

## नवं आकाश अंगावर पेलू दे

नुकतीच आकार घेते कळी, आई तिजला उमलू दे
अंकुरलेल्या बीजाला, नवं आकाश अंगावर पेलू दे

गं सुख देणारी कल्पतरू मी
तृण मजला तू जाणू नकोस,
गं स्त्री भृणाचा शाप ठेवूनी
सुडाने गळा तू घोटु नकोस
बेसुरी या दुनियेला, सप्त सुरांनी एकदाच भिजवू दे

गं तुझ्या कुशीच्या क्षितिजावरती
तळपतो सूर्य ममतेचा थोर,
गं श्वासामधला तू श्वास पुरवून
रक्त मासाची जपलीस कोर
कल्पना बनून मजला, अवकाश एकदाचं न्याहळू दे

गं श्रावणवेड पांघरून मनावर
तू कावडीची का आस धरती ?
ग खुशाल दिव्याची थोरवी गा
किंतु लाथाडतेस का दूर ज्योती ?
संसाराची शिलेदार होऊन, अंधार एकदाच हटवू दे

दान समज, दे संधी मला
भले, नको लावू तू लळा,
जैसे बोले तैसे, मी न करता
खुशाल घोट मग माझा गळा
आज भेद नीतीला दूर सारून, तुझ्या पदरासवे मला खेळू दे

**महेंद्र सदाशिव वाकळे**
उपकार्यकारी अभियंता, महापारेषण, मुंबई

## आहुती



आतंकवादा परी नक्षलवाद गंभीर आहे.
शासन अस्वस्थ तर नक्षली खंबीर आहे.
दोघांच्या वादामध्ये कर्मचाऱ्यात भीती आहे.
जनता घाबरून जगते ही कोणती नीती आहे.
नक्षली मागण्या मागतील सरकार त्या धुडकावतील,
ते चिडतील, चिडून पुन्हा भू-सुरुंग पेरतील.
निष्पाप शिपाई मरतील, आहुत्या मात्र सौभाग्याच्या जातील.
अनेक पोरके होतील, कित्येकांना जन्माआधी बाप नसतील.
नक्षली निष्पाप मुंडके टांगतील, नेते पापांचे भागीदार होतील.
थोडेसे नक्षली मरतील, अनंत शिपाई शहीद होतील.
अंत्यदर्शना विना देह जळतील, मग त्यांची स्मारके होतील.
कुठवर शहिदांचे माय-बाप चिताग्नीविना जळतील.
नक्षलवाद साऱ्यांनाच कळतो आहे.
तरीही का रक्षक जिवंत जळतो आहे.
नक्षली संपवायचे की नक्षलवाद हे ठरवावं लागेल.
अजून किती शिपायांच्या बायकांना कुंकू पुसावं लागेल ?
हा नक्षली आपल्याच भाऊबंदाला जिवंत जाळत आहे.
हा आपसी वाद आपल्या राष्ट्रास उध्वस्त करत आहे.
किती हत्या करून नक्षली यम संतुष्ट होतील.
भयभीत जनता कधी नक्षलमुक्त होईल ?

**संतोष राजारामजी झुंजारे**
सहा. यंत्रचालक, १ ३ २ के.व्ही. उपकेंद्र, अकोला

## धूळ



आता खरेच मित्रा इतके करून पाहू
जर शक्य जाहले तर माणुस बनून पाहू

हसती सुखात अपुल्या सारे जरी जगी या
दु:खात परकियांच्या आपण रडून पाहू

अंधारल्या घरांना देण्या प्रकाश थोडा
पणती समान जगती थोडे जळून पाहू

अस्तित्व नष्ट करते बी वृक्ष व्हावयाला
मातीत यार इथल्या त्यासम रुजून पाहू

घेण्या विकत जगाचे अनमोल दु:ख मित्रा
सुख आपले अभागे आधी विकून पाहू

व्याकूळ जीवनाची शमण्या तृषा अघोरी
चल थेट आज सारा सागर पिऊन पाहू

जगण्यात रोजी आम्ही बस आरसेच पुसले
ही धूळ चेहऱ्याची आता पुसून पाहू

बुडताच सूर्य ज्या सम संधीप्रकाश उरतो
जग सोडल्या वरीही येथे उरून पाहू

**मसुद पटेल** (क.तं.)
२२० के.व्ही. उपकेंद्र, पुसद

## सुख

सुख म्हणजे, सुख म्हणजे काय असतं ?
सर्वांचं वेगळ असतं, महत्वाचं म्हणजे मानण्यात असतं.
समजण्यात असतं कळण्यात असतं
आईचं वेगळं असतं, बाबाचं वेगळं असतं
ताईचं, दादाचं वेगळं असतं
आईचं लेकरात असतं, बाबाचं आईत असतं
दादाचं वहिनीत, व ताईचं दादात असतं
कोणाचं रडण्यात असतं, कोणाचं रडविण्यात असतं
कोणाचं तोडण्यात, कोणाचं जोडण्यात असतं
कोणाचं वाट पाहण्यात असतं, कोणाचं विरहात असतं
कोणाचं विरहानंतरच्या भेटण्यात असतं.
सुख मानण्यात असतं हेच खरं
आपलं सुख आपल्यालाच ठरवायचं असतं
खरंतर सुख ही मनाची अवस्था आहे
ते बाहेरून येत नाही, आणि बाहेर जातही नाही
ते आपल्या आतच असतं
आपणच त्याचे मालक आहोत हे कळणं
हिच सुखाची खरी सुरूवात आहे.

**मधुसूदन विश्वनाथराव देशमुख**
कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण),
सांघिक कार्यालय, मुंबई

## सन २०१२-१३ नाट्यस्पर्धा आयोजन



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना सुप्तगुणांना वाव देण्यासाठी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दर दोन वर्षातून एकदा म्हणजे एक वर्ष क्रीडास्पर्धा व एक वर्ष नाट्यस्पर्धा आयोजित करण्याची मंजूरी दिल्याचे संदर्भीय परिपत्रक क्र. MSETCL / HR / IR / SPORTS / 4562 dt. 20 September 2010 अन्वये आपणांस कळविलेले आहे. त्याअनुषंगाने सन २०११-१२ च्या क्रीडास्पर्धा पुणे परिमंडलाने यशस्वीपणे संपन्न केल्या.

नाट्यस्पर्धा व क्रीडास्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून कार्यकारी संचालक (मासं) यांच्या निर्देशानुसार परिपत्रक क्र. महापारेषण / मासं / का.औ.सं.क.क. विभाग / ४१० / ९.१.०९ अन्वये आंतर-परिमंडलीय नाट्यस्पर्धा व क्रीडास्पर्धाचे पाच वर्षाचे (२००९ ते २०१३ पर्यंतचे) यजमान परिमंडल निश्चित करण्यात आल्याप्रमाणे यावर्षीच्या आंतर-परिमंडलीय नाट्यस्पर्धा वाशी परिमंडलाने माहे सप्टेंबर २०१२ अखेरपर्यंत आयोजित करावयाच्या आहेत.

सर्व परिमंडलांनी आंतर-मंडलीय नाट्यस्पर्धा माहे सप्टेंबर २०१२ च्या पहिल्या आठवडयापर्यंत आयोजित करून प्रथम आलेल्या नाटकाचे नामांकन सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवडयात वाशी परिमंडलाकडे पाठवावयाचे आहे.

सन २०१२-१३ पासून आंतर-कंपनी नाट्यस्पर्धा सुरु झाल्या आहेत या नाट्यस्पर्धेत आपल्या कंपनीचे आंतर-परिमंडलीय नाट्यस्पर्धेतून प्रथम आलेले नाटक आंतर-कंपनी नाट्यस्पर्धेसाठी पाठविण्यात येते.

नाट्यसंहिता निवडीपासून ते नाट्यप्रयोग सादरीकरणापर्यंत सर्व तांत्रिक व अतांत्रिक बाजूंवर पूर्ण लक्ष देऊन दर्जेदार सादरीकरण होणे आवश्यक आहे. नाटकाचा दर्जा वाढविण्यासाठी नाट्यकलेशी निगडित योग्य कर्मचारी कलावंत सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावर आवश्यक ते प्रयत्न करावे.

**- मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

## गौरव



### कु.प्रियंका बंदिछोडे हिचे माध्यमिक शालान्त परीक्षेत यश

कु. प्रियंका श्रीशैलप्पा बंदिछोडे ही मार्च-२०१२ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत (एस.एस.सी.) परीक्षेत ९७.६४% गुण मिळवून आदर्श विद्यालय, उमरगा, येथून उत्तीर्ण झाली आहे.

कु. प्रियंका ही २२० के.व्ही. उपकेंद्र तुळजापूर, येथील वरिष्ठ यंत्रचालक श्री.श्रीशैलप्पा तुकन्ना बंदिछोडे यांची कन्या आहे. या यशाबद्दल तिचे महापारेषण तर्फे हार्दिक अभिनंदन.

---



### चि. श्रीपाद म. चिलवंत याचे शालान्त परिक्षेत सुयश

चि.श्रीपाद मनोरंजन चिलवंत हा इयत्ता १०वी मध्ये ९६.३६% गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाला आहे. चि.श्रीपाद हा १३२ के.व्ही. उपकेंद्र लातूर (कोयना) येथे वरिष्ठ यंत्र चालक या पदावर कार्यरत असलेले श्री.एम.पी. चिलवंत यांचा पाल्य आहे. या यशाबद्दल त्याचे महापारेषण तर्फे हार्दिक अभिनंदन.

---



### हर्षवर्धन अ. बिलगये यांचे उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत यश

चि.हर्षवर्धन अशोकराव बिलगये याने मार्च २०१२ मध्ये झालेल्या इयत्ता १२वीच्या परीक्षेत ६०० पैकी ५३८ म्हणजे ८९.६७% गुण मिळवून अमरावती विभागातून वरुड तालुक्या मध्ये अपंगांमधून प्रथम येण्याचा बहुमान मिळविलेला आहे. हर्षवर्धन हा २० के.व्ही. उपकेंद्र अमरावती येथील वरिष्ठ यंत्रचालक श्री.अशोक चिंतामणजी बिलगये यांचा सुपुत्र आहे. त्याच्या या यशा बद्दल महापारेषणतर्फे त्याचे अभिनंदन.

## Let us make ERP a way of work life in MSETCL

With the active contribution, support and co-operation by all, we became the privileged class among the Government organization to achieve the milestone of go-live of ERP Project. We have successfully moved ahead from design to implementation to now operational stage. It has been long journey. We have put in considerable efforts during this period. It is now the stage where ERP system is made available for operation. Now it is expected to use ERP system in our day to day operations.

In order to facilitate use of ERP system by the end users, we have recently shifted ERP Champion and Core Team from the Project Team to the respective Process Owners i.e. HoDs. Now on, the HoDs shall be responsible for completion of ERP targets. The operational stage is last stage in ERP but most crucial for its success. After go-live, the system may have some issues which left to address. These issues are required to be identified and address. It is also required to be seen that the system is fully integrated with other functionalities of ERP. Hence this stage is considered as trial and error stage where one has to start using the system and test its applicability. In case of any shortcomings, it is to be brought to the notice of the concerned team. In case of technical issue, it should be taken up for technical consultation and if the issue pertain to the functional, it should taken to the functional expert i.e. respective HoD. Since design and implementation the technical issues are largely put into place at this stage it may have some issue on the functional side. With this anticipation the ERP resources are now handed over to the HoD to ensure proper attention.

The investment in the ERP is considerably high in terms of organizational time spent on this project. We intended to bring transparency in our business process with speed and efficiency. It was also contemplated that with ERP system we shall able to re-align our organization, reduce paper consumption and thereby reduce our overheads. It is now time to check the outcome and leverage on the capabilities of the ERP system. The return on investment of ERP is many folds. It has taken many organizations to higher level of excellence. Almost all successful organizations work on ERP System.

I therefore urge you to take this opportunity and start working on ERP system. In case of any assistance is needed you may seek help from ERP champion or Core Team Member. They shall provide you assistance. Still there is any issue you can contact your HoD who shall ensure necessary guidance to you. Our organization has successfully embarked on many path breaking initiatives. I am sure you will continue your hard work and make ERP fully operationalised in our organization. In this effort, if you feel I am any help to you please feel free to share your concerns with me, I shall be happy to hear them and assure its remedial measure. With best wishes and with feeling of, “Hum Honge Kamyab”

# From The Desk of ED (HR)

## Building Required Skills in Employees through Training

We have been successfully running various training programmes in our company. These programmes can be categorized into conventional and non-conventional. In conventional, training is being organized as per our practices, which is primarily oriented towards technical aspects. While planning such programmes, we endeavor to enhance its coverage and quality. Training programmes of Induction Level Training for newly appointed JEs, Operators/ Technicians, its refresher courses, various Hot Line Maintenance training conducted through NPTI, Bangalore, nominations to various external technical training, participation in seminar/ conferences fall under this category.

While augmenting our conventional training programme, since 2011 we have planned various non-conventional training programme considering specific need of targeted audience, whom we call it TI (Targeted Interventions). In that context plethora of training are identified such as MDP (Management Development Programme) for senior engineers of transmission and civil cadre as well as senior officers of non-technical cadre, functional training for various departments like vigilance and security, materials, TTT (Train The Trainer) for the faculties of our Regional Training Centres, Personal Effectiveness for personal and secretarial staff, attitudinal and driving skill improvement training to Company's Vehicle Driver, quick organisation familiarization training (Induction Training) for newly appointed JEs at Corporate Office, Retirement and Financial Planning Training for those who would be retiring in coming two years, Women Capacity Development Training, Safety etc. These training are being conducted internally through our RTCs as well as externally through reputed training agency at the convenient places. Series of training conducted to cover entire targeted population.

Our Company believes training as the core element of employee development. Its vision is to build required competencies of employees and therefore consider it as an investment as operating expenses and not as additional overheads. The belief is that it shall enhance competence level of employees which in turn result in betterment of operational output of the company. I therefore expect from the employees who have undergone the training to put the leaning they had in training into practice. Now, that they are trained how to sharpen the sword, now we expect them to do the sharpening by their own on regular basis through practice.

It is difficult to measure and quantify the benefit of training distinctly as it is not possible to separate it out. It is enabling factor, as such it can not be calculated to input to output ratio. These are perceived results which can be factored to betterment of organization performance. It has positive impact on behavioral factors too like moral, motivation, satisfaction, pride, recognition etc. which assist in creating positive drive for betterment of organization performance. In short training has immense benefits, it is upto us how much return we give on investment made by the Company. I urge all to ponder on this thought and expect you to enhance your productivity level to a next level. Enjoy many more learning ahead.

# सांघिक कार्यालयात साजरा झालेल्या वर्धापन दिनाची क्षणचित्रे



सूत्र संचालन करताना
मुख्य औद्योगिक
संबंध अधिकारी
श्री. अनंत पाटील



आरोग्य तपासणीसाठी
रांगेत उभे असलेले
कर्मचारी व अधिकारी



समारोपानंतर
वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत
महिला अधिकारी
व कर्मचारी

**महा**पारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित


**संपादक : श्री. सचिन ढवण, जनसंपर्क अधिकारी**

E-mail : prohr@mahatransco.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.